सामना उत्सव रविवार पुरवणी
गुरुजी
शोध
आपली प्रतिक्रिया कळवा

# सामर्थ्य आहे चळवळीचे!



**प्रपंच आणि परमार्थ कसा साधावा याचा खरा बोध ज्याला घ्यायचा असेल त्याने दासबोध मुळातून अभ्यासावा. दासबोध हा ग्रंथ फक्त देवघरात ठेवण्याचा किंवा काही विशिष्ट काळात पारायण करण्याचा ग्रंथ नव्हे!**

वीस दशकं आणि दोनशे समास असलेला ओवीबद्ध दासबोध हा मूलत: गुरू-शिष्य संवाद आहे. हिंदुस्थानी अध्यात्माच्या इतिहासात, उपनिषदकालापासून गुरुशिष्य संवादाद्वारे ज्ञानदानाची परंपरा आढळते. प्रस्थानत्रयीपैकी श्रीमद्‌भगवद्‌गीता हा श्रीकृष्ण-अर्जुन यांच्यातील संवाद विशेष प्रसिद्ध आहे. समर्थ रामदास स्वामी आणि लेखनिकाचे कार्य करणारा त्यांचा प्रिय शिष्य कल्याणस्वामी, यांच्यामधल्या संवादावर जरी दासबोध आधारित असला तरी समर्थांच्या आबाल-वृद्ध, स्त्री-पुरुषादि अनेक स्तरांतील सर्व शिष्यांना बोध देण्याच्या उद्देशानेच या ग्रंथाची रचना झाली.

भक्तिमार्गाचं प्रतिपादन हे दासबोधाचं महत्त्वाचं उद्दिष्ट, तर अद्वैत वेदांत हे मर्मस्थान! भक्तिमार्ग अनुसरताना, अंत:स्थ असलेल्या ब्रह्मतत्त्वाची स्वयंप्रचीती येणे या अद्वैत वेदांताच्या मूळ तत्त्वाशी सुसंगत अशी दासबोधाची बांधणी समर्थांनी केली आहे. स्वत: समर्थ रामदास स्वामी म्हणजे दासभक्तीचं अत्युच्च प्रतीक! ‘श्रीरामचंद्र’ या उपास्य दैवताची केलेली उत्कट भक्ती, त्यामुळे समर्थांना आलेला आत्मप्रचीतीचा अनुभव आणि या अनुभवाच्या जोरावर त्यानंतरच्या काळात त्यांनी उभं केलेलं आध्यात्मिक चळवळीचं प्रचंड कार्य, या सगळ्याचं प्रतिबिंब दासबोधात ठायी ठायी पडल्याचं दिसतं. दासबोधातील प्रत्येक ओवीमधे अशी आत्मानुभवाची पेरणी झाल्यामुळे, ती ओवी जिवंत आणि रसरशीत असल्याची जाणीव होते यात नवल नाही!

वैदिक महावाक्ये, अष्टधा प्रकृती, पंचीकरण इत्यादी गहन आध्यात्मिक संकल्पनाचं विवरण करतानाच ‘वीट’ कशी तयार होते याचंही बारकाईने वर्णन केलेलं दासबोधात आढळतं, अगदी चुना-मातीच्या प्रमाणासह! त्याकाळी सिमेंट अस्तित्वात नव्हतं, अन्यथा त्याचंही अचूक प्रमाण समर्थांनी सांगितलं असतं हे निश्चित! कोणताही प्रमेय सिद्ध करताना एखादा गणितज्ञ ज्याप्रकारे एकेका गृहीतकाची आणि तात्पर्याची सूत्रबद्ध मांडणी करतो तशीच सूत्रबद्ध ओव्यांची रचना दासबोधाच्या प्रत्येक समासात आणि दशकात केली गेली आहे. कोणत्याही क्षेत्रातील यशप्राप्तीसाठी ज्ञान जितकं महत्त्वाचं तितकाच प्रयत्नही महत्त्वाचा ही दासबोधातली अजून एक महत्त्वाची शिकवण. कोणतीही आपत्ती आली असता केवळ देवाचं नाव घेऊन चालणार नाही, तर त्याकरिता योग्य प्रयत्नांची कास धरलीच पाहिजे, कष्टांना आणि प्रयत्नांना पर्याय नाही हे त्यांचे प्रतिपादन त्या काळची सामाजिक व वैचारिक स्थिती पाहता अत्यंत आक्रमक आणि धाडसाचेच होते. मात्र त्या प्रयत्नांना ‘आपण निमित्तमात्र असून कार्य भगवद्‌इच्छेने चालू आहे’, अशा अलिप्ततेच्या भावनेचं अधिष्ठान ठेवण्याचा पुरस्कार त्यांनी केला.

सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील तयाचे।।
परंतु येथे भगवंताचे। अधिष्ठान पाहिजे।।
(दासबोध २०.४.२६)

परमार्थाला व्यवहारचातुर्याची जोड, व्यवहाराला आध्यात्मिक विचारांची जोड आणि या दोन्हीला प्रगल्भ अशा विवेकप्रवण बुद्धिप्रामाण्याची जोड हे अद्भुत रसायन केवळ दासबोधातच आढळतं. भक्तीला कार्यशक्तीची जोड देणारा समर्थांचा जाज्वल्य प्रयत्नवाद तत्कालीन समाजाला जसा प्रेरणादायी ठरला तसा तो आजही समाजातील प्रत्येक मनुष्याला स्फूर्ती द्यायला सक्षम आहे. समाज प्रबोधनासाठी, समाजाचे दोन ढोबळ विभाग समर्थांनी केले. एक विभाग म्हणजे फक्त आध्यात्मिक साधनेला जीवनाचं उद्दिष्ट्य ज्यांनी मानलं आहे अशा मुमुक्षू साधकांचा विभाग आणि दुसरा, कुटुंबाचा प्रपंच सांभाळत परमार्थ करणाऱ्यांचा विभाग. ‘प्रपंच’ हा शब्द दासबोधात अनेक ठिकाणी वापरला गेला आहे. या शब्दाची, समर्थांना अपेक्षित असलेली नेमकी व्याख्या लक्षात आली नाही तर दासबोधात परमार्थापेक्षा प्रपंचाला अधिक महत्त्व दिले आहे असा सामान्य मनुष्याचा चुकीचा समज होऊन गल्लत होते. अगदी सूक्ष्म दृष्टीने दासबोधाचा अभ्यास केला तर ‘सांसारिक प्रपंच’ आणि ‘वैश्विक प्रपंच’ अशी प्रपंच या एकाच शब्दाची फोड समाजातल्या विभागांनुसार समर्थांनी केली आहे हे लक्षात येतं. प्रपंचाची ही व्याख्या एकदा लक्षात घेतली की मग, प्रपंच करावा नेटका! मग घ्यावे परमार्थ विवेका! या ओवीचा नेमका उद्देश ध्यानात येतो. संपूर्णपणे अध्यात्माला वाहून घेतलेल्या व्यक्तींनासुद्धा समाज धारणेचा प्रपंच सांभाळावाच लागतो. अशा व्यक्तींना, ‘आधी समाजाचा प्रपंच नीट करा, समाज बलशाली, संघटित करण्यासाठी प्रयत्न करा, जेणेकरून अंतिम परमार्थाचे अधिकारी होण्यासाठी तुम्ही लायक व्हाल’, हा कानमंत्र देणे समर्थांना अभिप्रेत होते.

दासबोधाबद्दल लिहावं तेवढं कमीच आहे. इतकं या ग्रंथाचं महानत्व आहे. ज्ञान, कर्म आणि भक्तिमार्गाची सांगड घालून प्रपंच आणि परमार्थ कसा साधावा याचा खरा बोध ज्याला घ्यायचा असेल त्याने दासबोध मुळातून अभ्यासावा. दासबोध हा ग्रंथ फक्त देवघरात ठेवण्याचा किंवा काही विशिष्ट काळात पारायण करण्याचा ग्रंथ नव्हे! प्रत्येक ओवीच्या शब्दार्थावरच न थांबता त्याच्या लक्ष्यार्थाचा वेध घेतला पाहिजे. अशी एक एक ओवी आत्मसात झाल्यानंतर ती कृतीत उतरवणे आणि त्यानुसार जीवनात बदल घडवणे हीच दासबोधकर्त्या समर्थ रामदास स्वामींना अपेक्षित असलेली मनुष्य जीवनाची कृतार्थता होय.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

(श्री बापट गुरुजी, ओम सद्‌गुरू प्रतिष्ठानच्या बदलापूर, बोरिवली आणि खोपोली स्थानांवर प्रमुखपदी आहेत.)

- बापट गुरुजी

marathi matrimony.com A part of BharatMatrimony.com Register FREE
Ads by Guruji


Ads by Guruji


